महाराष्ट्र पोलीस

## प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

PUNE CITY TRAFFIC POLICE

जा.क्र./पोउआ/वाह/ ६२९१/२०२४ पुणे — दिनांक - ०२ /०९/२०२४

पुणे शहरातील सिंहगड रोड वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, सिंहगड रोड वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापुर्वी काही वाहतुक संदर्भातीस आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

सिंहगड रोड वाहतुक विभागाअंतर्गत सिंहगड रोड वरील संतोष हॉल चौकातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी व वाहतुक सुरळीत होण्यासाठी आनंदनगर रोडवरील वाहतुकी मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

### सिंहगड रोड वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- आनंदनगर रोडवरुन स्वारगेट कडे जाण्याकरीता संतोष हॉल चौकात येवुन डावीकडे वळुन वडगांव पुलाचे दिशेन सरळ पुढे १५० मीटर अंतरावर येवुन टायटन वॉच समोर यु टर्न घेवुन स्वारगेट मार्गीकेवर यावे.
- वडगाव वरुन येवुन आनंदनगर भागात जाण्याकरीता संतोष हॉल चौकात सरळ पुढे १०० मीटर अंतरावर येवुन आपटे कॉलनी समोरुन उजव्या बाजुस यु टर्न घेवुन सिंहगड मार्गावर यावे व पुढे सरळ संतोष हॉल चौकात येवुन डावीकडे वळुन आनंदनगर मार्गावर यावे.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक – ०२/०९/२०२४ ते दिनांक – १६ /०९ /२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,
वाहतूक शाखा पुणे शहर

**प्रति,**

**१)जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** – ४, पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४)सर्व प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, पुणे शहर.**
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित यांना तात्काळ अदा करून, यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६)पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.